भा.प्र.से. अधिकाऱ्यांनी त्यांची सन २०१५ ची वार्षिक अचल मालमत्ता विवरणपत्रे दिनांक ३१ जानेवारी,२०१६ पर्यंत सादर करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः भाप्रसे- १५१५/ प्र.क. ३३१ /२०१५/९

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
तारीख: १ जानेवारी, २०१६

वाचा -

१) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : भाप्रसे - ४५०४/प्र.क्र.७१/२००४/९,दि..२६.५.२००४
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: भाप्रसे-१५०७/१३४२/प्र.क्र.२३४/०७/९, दि. ३१.१०.२००७
३) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः भाप्रसे-१५१४/प्र.क्र.२६५/२०१४/९, दि.८.१.२०१५

प्रस्तावना -

अखिल भारतीय सेवा (वर्तणूक) नियम १९६८ मधील नियम १६(२) नुसार भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांनी दरवर्षी विहित कालावधीत वार्षिक अचल मालमत्ता विवरणपत्रे विहित नमुन्यात शासनास सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार सन २०१५ या वर्षाची दिनांक ०१.०१.२०१६ रोजीची स्थिती दर्शविणारी वार्षिक अचल मालमत्ता विवरणपत्रे सादर करण्यासंदर्भात या परिपत्रकान्वये सुचना देण्यात येत आहेत.

शासन परिपत्रक -

महाराष्ट्र संवर्गातील भारतीय प्रशासन सेवेतील सर्व अधिकाऱ्यांनी सन २०१५ चे वार्षिक अचल मालमत्ता विवरणपत्रे सादर करण्यासंदर्भात खालील सुचनांप्रमाणे कार्यवाही करावी:

१) सन २०१५ ची (दिनांक ०१.०१.२०१६ ची स्थिती दर्शविणारी) वार्षिक अचल मालमत्ता विवरणपत्रे सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात दिनांकित स्वाक्षरीसह व्दिप्रतीत, सीलबंद स्वरूपात या विभागाकडे दिनांक ३१.०१.२०१६ पर्यंत प्राप्त होतील अशा रितीने पाठवावीत.

२) वार्षिक अचल मालमत्ता विवरणपत्रे सीलबंद केलेल्या लिफाफ्यावर खालील बाबी नमुद कराव्यात:

a) Name and Designation of the Officer

b) Allotment Year

c) Year of Property Return-2015 (As on 1.1.2016)

३) अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यासंदर्भात वार्षिक अचल मालमत्ता विवरणपत्रे विहित वेळेत सादर करणे ही बाब आता संबंधित अधिकाऱ्यांना दक्षता प्रमाणपत्र (Vigilance Certificate)

देण्याशी निगडीत करण्यात आलेली असल्याने सर्व भाप्रसे अधिकाऱ्यांनी कोणत्याही परिस्थितीत त्यांची वार्षिक अचल मालमत्ता विवरणपत्रे दिनांक ३१.०१.२०१६ पूर्वी सादर करावीत व विवरणपत्रावर न चुकता स्वाक्षरी करून त्याखाली दिनांक नमूद करण्यात यावा.

४) केंद्र शासनाच्या दिनांक ४.१.१९९४ च्या पत्रातील सूचनेनुसार, वार्षिक अचल मालमत्ता विवरणपत्रे विहित कालावधीत सादर न केल्यास संबंधित अधिकाऱ्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही केली जावू शकते.

५) वार्षिक अचल मालमत्ता विवरणपत्रे समाविष्ट असलेले सीलबंद लिफाफे कक्ष अधिकारी, कार्यासन क्रमांक - ९, सामान्य प्रशासन विभाग, दालन क्रमांक ५५८, ५ वा मजला, मंत्रालय, मुंबई -४०००३२ या पत्त्यावर पोस्टाने किंवा खास दुतामार्फत दिनांक ३१.०१.२०१६ पूर्वी पाठवावेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१५१२३११७१६०३४३०७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pranali Ulhas Gosavi

Digitally signed by Pranali Ulhas Gosavi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=193e87f0b8c5f58941e4d2fbfdb3458deab3864a976f06d3984c8149bb888d55, cn=Pranali Ulhas Gosavi
Date: 2016.01.01 12:12:57 +05'30'

(प्रणाली गोसावी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन,मलबार हिल,मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव,
३. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद, विधानभवन,मुंबई
४. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मंत्रालयीन विभागाचे सर्व अ.मु.स. /प्रधान सचिव/सचिव,
६. महाराष्ट्र संवर्गातील भारतीय प्रशासन सेवेतील सर्व अधिकारी,
७. उपसचिव(भापोसे कक्ष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
८. उपसचिव(भावसे कक्ष), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. निवड नस्ती

STATEMENT OF IMMOVABLE PROPERTY RETURN FOR THE YEAR ____ AS ON __/__/____

1. **Name of Officer (in full):** ____ **3. Cadre & Batch**: ____________________
2. **Service to which the Officer belongs:** **Indian Administrative Service** **4. Present Pay:** ________________

Name of District, Sub-Division, Taluk & Village or City in which property is situated (full location & postal address)	Name & Details of Property, Housing, Lands and Other Buildings	Cost of construction/Acquirement (and year when purchased) including of land in case of house	Present Value *	If not in own name, state in whose name held & his/her relationship to the Govt. Servant	How acquired, whether by purchase, lease **, mortgage, inheritance, gift or otherwise with date of acquisition & name with details of person(s) from whom acquired.	Annual Income from property	Remarks
(1)	(2)	(3)	(4)	(5)	(6)	(7)	(8)

Signature:

Name:

Designation:

Date:

Note: Please read the notes overleaf before filling up the form.

NOTES

1) * In case where it is not possible to assess the value accurately, the approximate value in relation to present conditions may be indicated.

2) ** Includes short term leases also.

3) The declaration form is required to be filled in and submitted by every member of Class I and Class II services under relevant provisions of Conduct Rules and the first appointment to the Service and thereafter, at the interval of every twelve months, giving particulars of all immovable property owned, acquired or inherited by him or held by him on lease or mortgage, either in his own name or in the name of any member of his family or in the name of any other person dependent on Government Servant.

4) The wording 'No Change or No Addition or As in previous year' may be avoided and all details filled up.

5) AIS Officers are requested to fill the form in duplicate.